1505


महाराष्ट्र शासन

विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर-४१६००४

Web:- www.jdhokop.org E-mail: jdhokop@gmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्र. : शिसस/उशि/कोवि/अनि-१,२,३/२०१९/ 4435 दिनांक :- ०८/११/२०१९.

प्रति,

१. मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२. प्राचार्य,
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये,
कोल्हापूर / सांगली / सातारा.


VIVEKANAND COLLEGE
INWARD
No. 1126
Date- 9.11.19
KOLHAPUR


विषय :- दि.२६/११/२०१९ रोजी संविधान दिन साजरा करण्याबाबत, तसेच दि.२६/११/२०१९ ते १४/०४/२०२० या कालावधीत आयोजित करावयाच्या संविधान जनजागृती मोहीम संदर्भात.

संदर्भ :- १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन परिपत्रक क्र. : सामान्य-२०१५/प्र.क्र.३५७/ बांधकामे, दि.०६/११/२०१९.

२) संचालनालयाकडील पत्र क्रमांक -उशिसं/मवि -१/संविधान दिन/परिपत्रक/२०१९/१४५६७, दि.०७.११.२०१९

उपरोक्त विषयांकित बाबतच्या संदर्भिय पत्र क्र.२ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून दि.२६ नोव्हेंबर २०१५ हा दिवस संविधान दिन म्हणून राज्यात मोठया प्रमाणात साजरा करण्यात आला. तसेच, उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याबाबत सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या होत्या.

सन २०१९ हे वर्ष भारतामध्ये संविधान स्विकृतीचे ७० वे वर्ष साजरे होत आहे. दि.२६ नोव्हेंबर २०१९ रोजी संविधान दिन साजरा करणे. तसेच, दि.२६/११/२०१९ ते१४/०४/२०२० या कालावधीत संविधान जनजागृती मोहीमेमध्ये सोबतच्या पत्रातील कार्यक्रमांचा अंतर्भाव करावा व या कालावधीत संविधान जनजागृती मोहीमेअंतर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल यथाशिघ्र विभागीय सहसंचालक कार्यालयास सादर करणेत यावा.

प्रा. डी. ए. पवार
Pod
8/11/2019
9/11/19

8.11.19
विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत :- १) मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण),महाराष्ट्र राज्य, पुणे- १ यांना माहितीस्त्व सविनय सादर.
२) मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, कोल्हापूर.
विषयांकित प्रकरणी आपल्या कार्यकक्षेतील विना अनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालये (कोल्हापूर / सातारा / सांगली ) यांचेकडे पाठपूराव करण्यात यावा. तसेच, सर्व महाविद्यालयांचे अहवाल आपल्या स्तरावर संकलित करुन एकत्रितपणे या कार्यालयास सादर करण्यात यावेत.


Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## नोटीस

**दिनांक : २१.११.२०१९**

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, २६ नोव्हेंबर २०१९ रोजी संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे समुह वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्वांनी सकाळी ०९.०० वाजता महाविद्यालयाच्या ऑफिस समोरील प्रांगणात वेळेवर उपस्थित रहावे.

( प्रा.डी.ए.पवार )
विभागप्रमुख,
राज्यशास्त्र विभाग.

( डॉ.एस.वाय.होनगेकर )
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

B.A.III - History
BA III Marathi
B.A. I Marathi
B.A I STD

B.Com. I - B. Dharankar
B.A.III (Eco)
B.Com.I

Scanned by CamScanner

1521

656835
06 Nov 2019

MINISTRY OF HUMAN RESOURCE DEVELOPMENT
Department of Higher Education

VIVEKANAND COLLEGE
No. 1161
Date- 14/11/19
KOLHAPUR

Hon'ble Prime Minister desires that the 70th Anniversary of Indian Constitution may be celebrated as a one year function starting from **26th November, 2019**. This programme is to focus on Fundamental Duties and ensure that every citizen follows them systematically. The main strategy is to run it as a mass movement rather than a government scheme allowing participation of one and all.

In the meeting held by Hon'ble Prime Minister today, apart from what is already planned, the following may be included and taken forwarded by UGC:-

1. **Spreading awareness about the Constitution and Fundamental Duties**

Every Law college may be asked to identify (10) colleges/high education institutions located nearby and organise talks about the importance of the Indian Constitution and to spread awareness about the Fundamental Duties. UGC may coordinate with all the affiliating Universities to call for a meeting of the law colleges and prepare a detailed programme for this purpose. UGC may also ensure that the programme is properly monitored. Since there are about 1200 law colleges and it is expected that more than 10000 higher educational institutions should be covered under this part of the campaign.

D.A. Pawar
Pls do
14/11/2019

2. **Live telecast of the Parliament Session on 26.11.2019**

All the higher educational institutions may be asked to make arrangements for watching that live the programme from the Central Hall of Parliament to commemorate the 70th Anniversary of Indian Constitution. It must be ensured that the programme is seen by as many students as possible, preferably in a central location.

14/11/19

.......2

PTO

Scanned by CamScanner

श्री. डी. ए. पवार,
राज्यशास्त्र विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त).
दि. २१.११.२०१९

मा. प्राचार्य,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त).

विषय: महाविद्यालयात संसदेतील कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाबाबत

आदरणीय सर,

मानव संसाधन मंत्रालयाकडून मिळालेल्या पत्रानुसार (महाविद्यालयाचे पत्र क्र. ११६१ दि. १४.११.२०१९) दि. २६.११.२०१९ रोजी संसादेतील संविधान दिन कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण महाविद्यालयामध्ये करावयाचे आहे. त्यासाठी मंगळवार दि. २६.११.२०१९ रोजी रू नं. १३ मध्ये स. ११ वाजता या प्रक्षेपणाची सोय करण्याची परवानगी मिळावी व आवश्यक तंत्रासहाय्य उपलब्ध व्हावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(श्री. डी. ए. पवार)

Scanned by CamScanner

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

राज्यशास्त्र विभाग

दि. २१.११.२०१९

**सूचना**

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनीना कळविण्यात येते की मंगळवार दि. २६ नोव्हेंबर, २०१९ रोजी संविधान दिनानिमित स. ११.०० वाजता रूम नं. १३ मध्ये **संसदेतील संविधान दिन कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण** दाखविण्यात येणार आहे. सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी वेळेत हजार राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.

(श्री. डी. ए. पवार)

राज्यशास्त्र विभागप्रमुख

(डॉ. एस. वाय. होनगेकर)

प्राचार्य

विवेकानंद कॉलेज

कोल्हापूर

Scanned by CamScanner

# विवेकानंदमध्ये संविधनाच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विवेकानंद कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभागातर्फे ७०व्या संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून 'संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी उपस्थित प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनीकडून संविधनाच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन करण्यात आले व संविधानाचे ध्येय व उद्दिष्टाविषयी मार्गदर्शन केले.



कोल्हापूर : विवेकानद कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभागातर्फे ७० व्या सविधान दिनानिमित्त आपले विचार व्यक्त करताना प्रा. डी. ए. पवार. सोबत प्रा. समीक्षा फराकटे, सी. बी. दौडमणी, प्रा. संदीप पाटील, प्रा. एस. एम. रुईकर, प्रा. किरण पाटील, प्रा. भाऊसाहेब गोसावी व अन्य मान्यवर.

यावेळी प्रा. डी. ए. पवार म्हणाले, भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेनुसार भारतीय राज्यघटनेची निर्मिती भारतीय जनतेने केली आहे. तिचा स्वच्छेने स्वीकारही जनतेनेच केला आहे. ही राज्यघटना भारतीय जनतेवर कोणीही लादलेली नाही. या राज्यघटनेचे पावित्र्य राखणे आवश्यक आहे. सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक गणराज्य यांचा अपेक्षित अर्थ काय आहे, या विषयीची सविस्तर माहिती दिली. तसेच न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या उद्दिष्टांचीही सविस्तर मांडणी केली. यावेळी प्रा. समीक्षा फराकटे म्हणाल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी राज्यघटनेचा मसूदा तयार करून घटना समितीस सादर केला. हे भारतीय संविधान शासनाची सत्ता नियंत्रित करण्यासाठी लागू करण्यात आले आहे.

याप्रसंगी ७० व्या संविधान दिनानिमित्त लोकसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. या कार्यक्रमासाठी विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे मार्गदर्शन लाभले. बी. ए. भाग तीनची विद्यार्थिनी शिवानी पुगावकरने आभार मानले. यावेळी प्रा. एस. एम. रुईकर, कला व वाणिज्य विभागाच्या अधिष्ठाता डॉ. श्रुती जोशी, रजिस्टार सी. बी. दौडमणी व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

Scanned by CamScanner



कोल्हापूर : बार्टी संस्थेच्या वतीने संविधान साक्षर ग्राम उपक्रमांतर्गत वडणगे येथे संविधान रॅली काढण्यात आली. २) विवेकानंद महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार, प्रा. समीक्षा फराकटे, सी. बी. दोडमणी आदी. ३) कोल्हापूर : बिंदू चौक येथे पिपल्स रिपब्लिकन पार्टी यांच्या वतीने संविधान दिनानिमित्त संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन करण्यात आले. यावेळी डी. जी. भास्कर, नंदकुमार गोंधळी, विद्याधर कांबळे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# शहर परिसरात विविध उपक्रमांनी संविधान दिन उत्साहात साजरा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बिंदू चौक येथे मंगळवारी संविधान दिन विविध सामाजिक संघटना राजकीय पक्ष यांच्यातर्फे साजरा करण्यात आला. तसेच जिल्ह्यात विविध सामाजिक संस्था, पक्ष, शैक्षणिक संस्थात संविधान दिन साजरा करण्यात आला.

पिपल्स रिपब्लिकन पार्टी यांच्या वतीने संविधान दिनानिमित्त संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर २६/११ हल्ल्यातील शहिदांना अभिवादन केले. यावेळी डी. जी. भास्कर, नंदकुमार गोंधळी, विद्याधर कांबळे, सुरेश सावर्डेकर, निवास सडोलीकर आदी उपस्थित होते.

एआयएमआयएमपक्षातर्फे मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. संविधानाची प्रत भेट म्हणून देण्यात आली.

यावेळी एआयएमआयएमचे युवा आघाडी पश्चिम महाराष्ट्र प्रमुख शाहीद शेख यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पवित्र संविधानाच्या निर्मितीत योगदान आहे. सध्या संविधान वाचविण्याची गरज सर्वांवर आहे' असे प्रतिपादन केले. यावेळी सागर शिंदे, तौफीक मुल्ला, विनोद बणगे, तौसिफ मोमीन, इम्रान शेख, फहिम वस्ता आदींची उपस्थिती होती.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांच्यातर्फे संविधान दिनानिमित्त बिंदू चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी संविधानाचे रक्षण करण्यासाठी सर्व धर्मनिरपेक्ष पक्षांनी एकत्र येण्याचे आवाहन पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. विश्वास देशमुख यांनी केले. तसेच घटनेच्या सरनाम्याच्या प्रती उपस्थितांना वाटण्यात आल्या. यावेळी पी. एस. कांबळे, भाऊसाहेब काळे, भीमराव कांबळे, पांडुरंग कांबळे, एम. आर. कांबळे, प्रकाश कांबळे, साताप्पा कांबळे, अशोक घाडगे, बाजीराव गायकवाड, शोभा कुमठेकर, बाबासाहेब भुयेकर, भगवान कांबळे आदी उपस्थित होते.

जवाहरनगर हायस्कूलमध्ये अध्यापक जनार्दन भास्कर यांनी संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन केले. न्यू कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी राज्यघटनेच्या सरनाम्याचे सामुदायीक वाचन केले. मिलिंद हायस्कूल (शाहूनगर), लहुजी शक्ती सेना, क्रांतीगुरू लहुजी साळवे प्रतिष्ठान, विद्यापीठ हायस्कूल, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल (संभाजीनगर) येथेही संविधान दिन साजरा करण्यात आला.

**वडणगेत 'संविधान साक्षर ग्राम'**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) समतादूत प्रकल्पांतर्गत संविधान साक्षर ग्राम उपक्रम राबविण्यात येणार आहे. वडणगे (ता. करवीर) येथे मंगळवारी या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. २५ डिसेंबरपर्यंत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

वडणगेत संविधान दिनानिमित्त संविधान रॅली काढण्यात आली. ही रॅली कन्या विद्यामंदिर, ग्रामपंचायत मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहापर्यंत काढण्यात आली. देवी पार्वती हायस्कूल, कन्या व कुमार विद्यामंदिर, द बुद्धिस्ट इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग होता.

बार्टी संस्थेच्या जिल्हा समन्वयक आशा रावण यांनी प्रास्ताविक करून बार्टीविषयी माहिती दिली. शिक्षणाधिकारी किरण लोहार, सरपंच वडणगेकर यांनी सरपंच, उपसरपंच यांनी सूत्रसंचालन एस. एस. भुमाळ यांनी केले. समतादूत प्रतिभा सावंत यांनी आभार मानले.

मुख्य प्रकल्प संचालक प्रज्ञा वाघमारे, प्रकल्प अधिकारी गणेश सव्वाखांडे यांच्या मार्गदर्शनाखाली किरण चौगुले यांनी नियोजन केले. कार्यक्रमाला गटविकास अधिकारी सचिन घाडगे, सरपंच सचिन चौगुले, उपसरपंच दीपक व्हरगे, पी. के. पाटील, सविता देसाई, भाग्यश्री खामकर आदींसह अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ, आरोग्य सेविका उपस्थित होते.

**विवेकानंद महाविद्यालय**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ७० व्या संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.

राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांच्याकडून संविधानाच्या प्रास्ताविका, सरनाम्याचे सामूहिक वाचन करवून घेतले. यावेळी प्रा. समीक्षा फराकटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संविधान दिनानिमित्त लोकसभेच्या कामकाजाचे भेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. शिवानी पुंगावकर हिने आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्रा. एस. एम. रुईकर, कला व वाणिज्य विभागाच्या अधिष्ठाता डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी उपस्थित होते.

**नूतन मराठी विद्यालय**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मिरजकर तिकटी येथील नूतन मराठी विद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक डी. ए. शिंदे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. एन. एस. भोसले यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व विषद केले. यावेळी जिमखानाप्रमुख आर. एन. कुंभार, डी. डी. कारेकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**वि. स. खांडेकर प्रशाला**

प्रभारी प्राचार्य पी. डी. धनवडे यांच्या हस्ते संविधान पुस्तकाचे पूजन झाले. विद्यार्थ्यांना संविधानाच्या पुस्तकाचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षिका नेहा कानकेकर, एम. के. भिकंगडे, डी. के. गायकर, एस. एन. जमादार, एम. ए. बुगडे आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर बौद्ध अवशेष व विचार संवर्धन समिती**

बिंदू चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्ष टी. एस. कांबळे, कार्याध्यक्ष बापूसाहेब कांबळे, कल्पना कांबळे, ललिता कांबळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेमध्ये मंगळवारी संविधान दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले.

कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी रविकांत आडसूळ, जि.प. सदस्य राजवर्धन निंबाळकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी संजय राजमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. योगेश साळे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी दीपक घाटे, कृषी विकास अधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम आदी उपस्थित होते. मुंबईत अतिरेक्यांनी २६/११ रोजी केलेल्या हल्ल्यात शहीद झालेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

**विद्यामंदिर उजळाईवाडी**

**उजळाईवाडी : प्रतिनिधी**

विद्यामंदिर उजळाईवाडी (ता. करवीर) येथे भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. सर्व विद्यार्थी सहभागी झाले. प्रारंभी फोटो पूजन मुख्याध्यापक बी. एस. संकेश्वरी यांनी केले. कार्यक्रमास सुनिता बिघुते, सुरेखा इंगळे, शोभा शिंदे, सुरेखा राठोड, मदाकिनी धोंगडे या सर्व मंडम हजर होत्या. सर्व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी संविधान दिनाचे महत्त्व सांगण्यात आले व संविधान गीत सादर करण्यात आले.

Scanned by CamScanner

पुढारी कोल्हापूर, गुरुवार, २८ नोव्हेंबर २०१९



विवेकानंद महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार, प्रा. समीक्षा फराकटे, सी. बी. दोडमणी आदी.

**विवेकानंद महाविद्यालय**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ७० व्या संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.

राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांच्याकडून संविधानाच्या प्रास्ताविका, सरनाम्याचे सामूहिक वाचन करवून घेतले. यावेळी प्रा. समीक्षा फराकटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संविधान दिनानिमित्त लोकसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. शिवानी पुंगावकरने आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. एम. वाय. होनगेकर, प्रा. एस. एम. गर्डकर, कला व वाणिज्य विभागाच्या अधिष्ठाता डॉ. श्रुती जोशी, रजिस्टार सी. बी. दोडमणी उपस्थित होते.

Scanned by CamScanner

# 'विवेकानंद'मध्ये संविधान दिवस साजरा

कोल्हापूर : प्रतिनिधी

विवेकानंद कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ७० व्या संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी उपस्थित प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्याकडून संविधानाच्या प्रास्ताविकेचे, सरनाम्याचे सामूहिक वाचन करून घेतले व संविधानाचे ध्येय व त्याची उद्दिष्टे याविषयी मार्गदर्शन केले.



विवेकानंद कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभागाच्यावतीने ७०व्या संविधान दिनानिमित्त आपले विचार व्यक्त करताना राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार.

यावेळी प्रा. डी. ए. पवार म्हणाले की, भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेनुसार भारतीय राज्यघटनेची निर्मिती भारतीय जनतेने केली असून तिचा स्वेच्छेने स्वीकारही जनतेनेच केला आहे. ही राज्यघटना भारतीय जनतेवर कोणीही लादलेली नाही. या राज्यघटनेचे पावित्र्य राखणे आवश्यक आहे. सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक गणराज्य यांचा अपेक्षित अर्थ काय आहे, याविषयीची सविस्तर माहिती दिली. तसेच न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या उद्दिष्टांचीही सविस्तर मांडणी केली. यावेळी प्रा. समीक्षा फराकटे म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी राज्यघटनेचा मसुदा तयार करून घटना समितीला सादर केला. हे भारतीय संविधान शासनाची सत्ता नियंत्रित करण्यासाठी लागू करण्यात आले आहे.

यानंतर ७० व्या संविधान दिनानिमित्त लोकसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. या कार्यक्रमासाठी विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे मार्गदर्शन लाभले. बी. ए. भाग तीनची विद्यार्थिनी शिवानी पुणावकर हिने आभार मानले. यावेळी प्रा. एस. एम. गईकर, कला व वाणिज्य विभागाच्या अधिष्ठाता डॉ. श्रुती जोशी, रजिस्टार सी. बी. दोडमणी व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

Scanned by CamScanner



Scanned by CamScanner



Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner